**प्रतिवादी क्र ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १३ तर्फे वकिल श्री. खिल्लारी यांचेतर्फे उलटतपास शपथेवर सुरु.**

५. माझे शिक्षण आठवीपर्यंत झाले आहे. माझे वडील मुरलीधर भिकाजी कचरे हे आमच्या कुटुंबाचे कर्ते पुरुष होते. आमच्या कुटुंबावर १९७८ साली भूविकास बँकेचे कर्ज होते किंवा नाही हे मला माहिती नाही. १९७८ साली भूविकास बँकेकडे गट क्र. १३४ हा गहाण असल्याबाबत मी स्पष्ट सांगू शकत नाही, पण तो असेल. भूविकास बँकेने या मिळकतीचा लिलाव काढला असलयाबाबत व त्याबाबतची नोटीस माझ्या भावाला व माझ्या वडीलाला दिली गेली असल्याबाबतची मला कल्पना नाही.

६. कारभारी रामचंद्र शिंदे हे माझ्या भावाचे सासरे आहे. कारभारी यांनी हे कर्ज फेडण्याकरिता आर्थिक सहायय आमच्या कुटुंबास केल्याबाबतची मला माहिती नाही. हे म्हणणे खोटे आहे की, कर्ज फेडण्याकरिता आर्थिक सहायय केले असल्याकारणाने गट क्र. १३४ मधील १ हे ४१ आर हे सुमनबाईच्या नावे करण्यात आले. सज्ञान झाल्यावर मी आमच्या कुटुंबाशी संबधित सर्व कागदपत्रे पाहिली आहेत. सुमनबाई यांच्या नावे करुन दिलेले गट क्र. १३४ मधील १ हे ४१ आर क्षेत्राचे खरेदीखत मी पाहिलेले आहे. गट क्र. १३४ च्या दक्षिणेकडील पूर्व–पश्चिम पटटी १९७८ साली माझ्या वडीलांनी सुमनबाईच्या नावे करुन दिली असल्याबाबतची मला माहिती नाही. हे म्हणणे खोटे आहे की, मागील ३०–३२ वर्षापासून मला सुमनबाईच्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखताबददलची माहिती होती. मी हयाच महिन्यात ते खरेदीखत पाहिलेले आहे.

७. दाव्यात हजर होतेवेळेस मी माझ्या वकिलांना सर्व माहिती दिली आहे. हे म्हणणे खोटे आहे की, माझा सुमनबाईस करुन दिलेल्या खरेदीखताबददल कोणताही वाद नाही. आम्हांला हे खरेदीखत मान्य नसल्याबददल आम्ही आमच्या वकिलांना माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कैफियतीमध्ये मी सुमनबाईच्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखतास कोणताही आक्षेप घेतला नाही.

प्रतिवादी क्र. १, ११ व १२ यांचे वकिल श्री. चौधरी यांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास दूपारी ३.३० पर्यंत तहकुब, उलटतपास दुपारी न घेतल्यास उलटतपास नाहीचा आदेश पारित.

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक –२२.०८.२०२४ (विनय बी.कांबळे)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर

**मध्यांन्हानंतर प्रतिवादी क्र ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१,११ व १२ तर्फे वकिल श्री. चौधरी यांचेतर्फे उलटतपास शपथेवर सुरु.**

८. माझे वडील मुरलीधर भिका कणसे यांचा मृत्यू वर्ष १९८० साली झाला. माझ्या वडीलांच्या हयातीपर्यंत ते कुटुंबाचे कर्ते होते. माझ्या वडीलांचे शेती व्यवसायात नावलौकिक होते. माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये जे काही व्यवहार केले ते कुटुंबाच्या व शेतीच्या विकासासाठी केले. आमच्या वडीलांच्या मृत्यूनंतर आमच्या वडीलांकडून मला गट क्र. १३४, ११८, १२१ व १८३ मधील मिळकती आल्या. आम्ही चौघे भावंड आहे. आम्ही सख्खे भाउ. माझ्या भावंडाची नावे बद्रीनारायण व कचरु अशी आहे. आमच्या बहिणीचे नाव सुषमा असे आहे. मी, बद्रीनारायण, कचरु व सुषमा हे मुरलीधर यांच्या पहिल्या पत्नीची मुले. बाळकृष्ण हा आमचा सावत्र भाउ. बाळकृष्ण यास चंद्रकला नामक बहिण होती. ती आमची सावत्र बहिण. माझ्या आईचे नाव गंगुबाई मुरलीधर कणसे असे होते. त्या दिनांक २७/०२/१९७८ रोजी मयत झाल्या. माझ्या मावशीचे नाव भागीरथी शंकर देवरे असे आहे. दाव्यात नमुद गट क्र. ६८, २५६, २५७ या मिळकती माझ्या आईला व माझ्या मावशीला त्यांच्या वडीलांकडून मिळाल्या होत्या. माझ्या आईच्या व मावशीच्या मृत्यूनंतर या मिळकती आमच्या कुटुंबाकडे आहेत. या मिळकतींशी बाळकृष्ण व चंद्रकला यांचा काहीएक संबंध नाही. त्यांच्या नावे ज्या मिळकती महसूल सदरी लागल्या त्या पोकळीस्त आहे.

९. बद्रीनारायण हे माझ्या वडीलांच्या हयातीपासून मुंबई येथे वास्तव्यास होते. ते मुंबई येथे नोकरीस होते. बाळकृष्ण हा ग्रामसेवक या पदी नोकरीस होता. वडीलांच्या हयातीत कोपरगांव येथे माझ्या वडीलांच्या काही मिळकती होत्या किंवा नाही याबददल मला कल्पना नाही. मी कुटुंबात सर्वांत लहान. माझी बहिण सुषमा हिचे पती हिंदुस्तान अरोनोटिक्समध्ये नोकरीला होते. तिच्या पतीच्या मृत्यूनंतर सुषमा ही अनुकंपा धरतीवर त्यांच्या जागी हिंदुस्तान अरोनोटिक्समध्ये नोकरीस लागली. मी नोकरीनिमित्त नाशिक येथे वास्तव्यास होतो. साक्षीदार स्वतः सांगतो की, सध्या तो मातुलठाण येथे वास्तव्यास आहे. आमचे वडील

मुरलीधर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्व वारसांची नावे दावा मिळकतीच्या महसूल सदरी लागली.

१०. १९९० साली शालिनी कुरकुटे हिस मी गट क्र. १८३ मधील १ हे ५७ आर मिळकत विकली. साक्षीदार असे सांगतो की, हा विक्रीचा व्यवहार कुटुंब एकत्रीत असताना झाला होता. बद्रीनारायण ही मिळकत माझ्या नावे केली व ती मी शालिनी कुरकुटेंना विकली. साक्षीदार स्वतः सांगतो की, हा व्यवहार सगळयांच्या संमतीने झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी व बाळकृष्ण व बद्रीनारायण असे बाहेर नोकरी करत असल्याकारणाने कचरु हा कौटुंबिक शेत मिळकती पाहत होता.

११. गट क्र. ६८ वर भूविकास बँकेचे कर्ज होते. गट क्र. ६८ मधील १ हे १ आर इतकी जमिन माझ्या नावे आहे. हे म्हणणे खोटे आहे की, सन १९९८–१९९९ मध्ये गट क्र. ६८ वर असलेले भूविकास बँकेचे कर्ज हे भरले गेले व तसा दाखला बँकेने निर्गमित केला. आमच्या संपूर्ण कुटुंबाची मिळकत साधारण २५ एकर इतकी होती. ही शेती पिकविण्याकरिता खर्च येत असत. गट क्र. ६८ मधील १ हे दिड आर इतके क्षेत्र कचरु याने उषा भास्कर शिंदे यांना कर्ज परतफेडीकरिता व जमिनीच्या विकास कामांकरिता विक्री केले होते. ही मिळकत उषा शिंदे यांच्या ताबेवहिवाटीस आहे. या व्यवहाराविरुध्द मी आजपर्यंत कुठेही तक्रार केलेली नाही. गट क्र. ६८ मधील १ हे १ आर, गट क्र. २५६ मधील ९३ आर व गट क्र. २५७ मधील ९३ आर या मिळकती माझ्या वैयक्तिक नावे आहेत. तसेच या मिळकती वाटप फेरफार क्र. ३९१२ अन्वये माझ्या ताबे वहिवाटीत आहे.

१२. गट क्र. १३४ मध्ये माझे कोणतेही क्षेत्र नाही. १९९० साली एकत्र कुटुंब असताना कचरुने चंद्रशेखर व कुसुमबाई यांच्या नावे गट क्र. १९९ मधील १ हे. क्षेत्र रक्कम रु. ३०,००० /– ला उत्तम नारायण फोपसे यांच्याकडून विकत घेतले. हे क्षेत्र कचरुचा मुलगा संतोष याचे ताबे वहिवाटीस आहे. फेरफार क्र. ३९१२ अन्वये कुसुमबाई यांच्या ताबेवहिवाटीस असलेले गट क्र. १९९ मधील ५० आर क्षेत्र हे कचरुचा मुलगा संतोष याचे नावे देण्यात आले. गट क्र. १३४ मध्ये माझ्या नावे असलेल्या १ हे ४१ आर मिळकती व्यतिरिक्त माझ्या नावे इतर कोणते क्षेत्र असल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५/०१/२००३ रोजी मी माझी बहिण सुषमा आढाव हिस गट क्र. १३४ मधील १ हे ३१ आर मिळकत खरेदीखताने विक्री केले. सुषमा आढाव यांची फेरफार क्र.३४२९ अन्वये गट क्र. १३४ च्या महसूल सदरी नोंद झाली आहे. हा फेरफार मी आजतागायत आव्हानीत केलेला नाही. फेरफार क्र. ३९१२ अन्वये आमच्यामध्ये जे काही वाटप माझ्यामध्ये कचरुमध्ये व कचरुचा मुलगा संतोष यांच्यामध्ये झालेले आहे ते मला

मान्य आहे. तसेच त्या फेरफारामध्ये माझी पत्नी कुसुमबाई हिचे देखील नाव असून तिच्या संदर्भात झालेली वाटणी देखील मला मान्य आहे.

१३. हे म्हणणे खोटे आहे की, गट क्र. १३४ मध्ये कचरुची वैयक्तिक विहिर आहे. गट क्र. १३४ मध्ये एकच विहिर आहे. गट क्र. १३४ मध्ये बाळकृष्ण याच्या नावे २ हे ५ आर इतके क्षेत्र आहे. हे म्हणणे खोटे आहे की, गट क्र. १३४ मध्ये जी विहिर आहे ती बाळकृष्ण यांच्या नावे असलेल्या २ हे ५ गुंठे क्षेत्रामध्ये आहे. हे म्हणणे खोटे आहे की, गट क्र. १३४ मध्ये माझा काहीएक हक्कसंबंध राहिलेला नाही. गट क्र. २९५ मध्ये माझ्या व संतोष याच्या नावे विहिरीकरिता १ गुंठे क्षेत्र खरेदी केले आहे. या खरेदीअन्वये आम्हां दोघांची नोंद महसूल सदरी झालेली आहे. हे क्षेत्र केव्हा खरेदी घेतले आहे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खोटे आहे की, हे क्षेत्र कचरुने खरेदी केले असल्याने मला आठवत नाही. हे म्हणणे खोटे आहे की, या क्षेत्रामध्ये विहिर घेवून कचरुने त्याच्या गट क्र. १३४ मध्ये असलेलया क्षेत्रामध्ये सायपनने पाणी नेले आहे. हे म्हणणे खोटे आहे की, गट क्र. २९५ मध्ये विहिर खोदलेली आहे. गट क्र. १३४ मध्ये पाणी नेण्याकरिता सायपनची सुविधा आहे. हे म्हणणे खोटे आहे की, कचरुने हे पाणी त्याच्या गट क्र. २९५ मधील विहिरीमधून सायपनव्दारे गट क्र. १३४ मध्ये नेले आहे. (साक्षीदार वारंवार असे कथन करतो की, गट क्र. २९५ मध्ये विहिरीच नाही.) हे म्हणणे खोटे आहे की, विहिरीशी व सायपनच्या पाईपलाईनशी कचरु व्यतिरिक्त इतर कुणाचाही संबंध नाही.

१४. माझे मोठे बंधू बद्रीनारायण हे वर्ष २००१ मध्ये मयत झाले. बद्रीनारायणच्या मृत्यूआधी साधारण २–३ वर्ष आगोदर त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला. त्यांची पत्नी मातुलठाण गावच्याच रहिवासी. हे म्हणणे खोटे आहे की, बद्रीनारायण व त्यांची पत्नी या दोघांचा मृत्यू मातुलठाण येथे झाला. साक्षीदार स्वतः सांगतो की, बद्रीनारायण यांच्या पत्नीचा मृत्यू मुंबई येथे झाला व त्यांचा अंत्यविधी मातुलठाण येथे केला. बद्रीनारायण यांचा मृत्यू मातुलठाण येथे झाला. बद्रीनारायण यांना पॅरालीसीस झाला होता. ते दोन वर्ष मातुलठाण येथे वास्तव्यास होते व आम्ही त्यांचे उपचार केले. आम्ही म्हणजे मी, कचरु व आमचे कुटुंबिय. हे म्हणणे खोटे आहे की, बद्रीनारायणच्या मृत्यूनंतर चंद्रशेखर व नितीन हे दोघे त्यांच्या अंत्यविधीला आले नाहीत. साक्षीदार पुन्हा असे सांगतो की, चंद्रशेखर हा अंत्यविधीस उपस्थित होता. माझ्या शपथपत्रामध्ये दिनांक २९/१०/२००१ रोजी बद्रीनारायण यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांचे कुटुंबीय आले नाही असे मी कथन केले आहे, पण ते चुकीचे आहे. हे म्हणणे खोटे आहे की, बद्रीनारायण यांच्या मृत्यूनंतर त्यांची मुले चंद्रशेखर व नितीन हे कधीही मातुलठाण येथे आले नाही. माझ्या कैफियतीमध्ये देखील बद्रीनारायणचे

वारस त्याच्या मृत्यूपश्चात अंत्यविधीला आले नसल्याचे मी नमुद आहे, पण देखील चुकीच आहे. हे म्हणणे खोटे आहे की, चंद्रशेखर आला असता माझी त्याचे सोबत एक दोनदा भेट झाली आहे. हे म्हणणे खोटे आहे की, चंद्रशेखरने त्याला जर का वाद मिळकतीमध्ये काही हिस्सा मिळाल्यास त्यातील काही हिस्सा मला देईल असे आमिष त्याने मला दिल्यामुळे मी वरील बाबींबददल खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. १० मधील मजकुर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २९५ मध्ये माझा हिस्सा असल्याचे मी खोटे कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटया शपथपत्राच्या आधारे आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र १५ तर्फे उलटतपास वकिल श्री. पी.आर होले यांचेकडून शपथेवर सुरु.</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, शालिनी कुरकुटे यांच्या हककात करुन दिलेले खरेदीखत मी आजतागायत कोठेही आव्हानीत केले नाही. दिनांक ०४/०५/१९९० रोजी शालिनी कुरकुटे यांच्या हक्कात खरेदीखत करुन दिले त्याच दिवशी गट क्र. १९९ मधील १ हे क्षेत्र आम्ही खरेदी केले. शालिनी कुरकुटे यांच्याकडून मिळालेल्या व्यवहारापोटीच्या रकमेतून ही मिळकत आम्ही खरेदी केली. आजरोजी माझ्या नावे ७.१७५ एकर क्षेत्र आहे. माझ्या पत्नीचे नावे आजरोजी कोणतेही क्षेत्र नाही. हे म्हणणे खोटे आहे की, खरेदी केलेल्या मिळकतीच्या मोबदल्याच्या काही रकमेमध्ये मी नाशिकमध्ये बंगला बांधला. शालिनी कुरकुटे यांना विक्री केलेली मिळकत ही कुटुंबाच्या हितासाठी विक्री केली होती.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

दिनांक -२२.०८.२०२४

(विनय बी.कांबळे)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर